# शिक्षणशास्त्र विद्याशाखा : प्रमाणपत्र शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

## *अनुक्रमणिका*


**शैक्षणिक वेळापत्रक** ........ ३
१. विद्याशाखेचा परिचय ........ ५
२. बालसंगोपन आणि रंजन शिक्षण (C31) : शिक्षणक्रमाविषयी ........ ५
२.१ शिक्षणक्रमाची संरचना
२.२ अध्ययन पद्धती
२.३ प्रवेश प्रक्रिया
२.४ शिक्षणक्रम शुल्क
२.५ कालावधी
२.६ मूल्यमापन प्रक्रिया
२.७ अभ्यासकेंद्र
३. स्वयं-साहाय्य गट प्रेरक/प्रेरिका (C32) : शिक्षणक्रमाविषयी ........ १९
३.१ शिक्षणक्रमाची संरचना
३.२ अध्ययन पद्धती
३.३ प्रवेश प्रक्रिया
३.४ शिक्षणक्रम शुल्क
३.५ कालावधी
३.६ मूल्यमापन प्रक्रिया
३.७ अभ्यासकेंद्र
४. शालेय व्यवहारांकरिता माहिती-संप्रेषण तंत्रविज्ञान (C35) : शिक्षणक्रमाविषयी ........ २७
४.१ शिक्षणक्रमाची संरचना
४.२ कालावधी
४.३ प्रवेश प्रक्रिया
४.४ शिक्षणक्रम शुल्क
४.५ मूल्यमापन प्रक्रिया
४.६ अभ्यासकेंद्र
५. आशययुक्त अध्यापन पद्धती (C36) : शिक्षणक्रमाविषयी ........ ३०
५.१ शिक्षणक्रमाची संरचना
५.२ प्रवेश प्रक्रिया
५.३ कालावधी
५.४ शिक्षणक्रम शुल्क
५.५ अभ्यासकेंद्र
६. मूल्यशिक्षणाची मूलतत्त्वे (C34) : शिक्षणक्रमाविषयी ........ ३४
६.१ शिक्षणक्रम संरचना
६.२ प्रवेश प्रक्रिया
६.३ कालावधी
६.४ माध्यम
६.५ शिक्षणक्रम शुल्क
६.६ संपर्कसत्र उपस्थिती
६.७ मूल्यमापन पद्धती
६.८ उत्तीर्णतेचे नियम
६.९ श्रेणी
६.१० अभ्यासकेंद्रे
७. नोंदणी प्रक्रिया ........ ३५
८. विभागीय केंद्रे/जिल्हा केंद्रे ........ ३६
९. विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना ........ ३७
१०. विशेष सूचना/संपर्कासाठी ........ ३७
११. परिशिष्ट ........ ३९

## निर्मिती

श्री. आनंद यादव

व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

© २०१३, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

■ **प्रथम प्रकाशन** : मे २०१३

■ **अक्षरजुळणी** : वैभव डी.टी.पी. सेंटर, नाशिक

■ **प्रकाशक** : डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

*NB-13-14-28 (Vaibhav)*

# शिक्षणशास्त्र विद्याशाखा : प्रमाणपत्र शिक्षणक्रम

## (शैक्षणिक वेळापत्रक : वर्ष २०१३-२०१४)

### बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C-31)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश | : | १ जुलै २०१३ ते ३१ जुलै २०१४ |
| २. | उद्‌बोधनसत्र | : | ऑगस्ट पहिला आठवडा |
| ३. | मुख्य संपर्कसत्र | : | सप्टेंबर-ऑक्टोबर (६ दिवस) |
| ४. | अंतिम संपर्कसत्र | : | फेब्रुवारी (६ दिवस) |
| ५. | परीक्षा अर्ज भरणे | : | मार्च २०१४ पर्यंत |
| ६. | अंतिम लेखी परीक्षा | : | मे २०१४ |
| ७. | निकाल | : | परीक्षेनंतर ४५ दिवसांत |

### शालेय व्यवहारांकरिता माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C-35)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश | : | १ जुलै २०१२ ते ३१ जुलै २०१२ |
| २. | मुख्य संपर्कसत्र | : | १/१०/१२ ते ३१/३/१३ |
| ३. | परीक्षा अर्ज भरणे | : | सप्टेंबर २०१२ |
| ४. | अंतिम लेखी परीक्षा | : | एप्रिल २०१३ (तोंडी परीक्षा) |
| ५. | निकाल | : | परीक्षेनंतर ४५ दिवसांनंतर |

### स्वयं-साहाय्य गट प्रेरक-प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C-32)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश | : | १ जुलै २०१३ ते ३१ जुलै २०१३ |
| २. | मुख्य संपर्कसत्र | : | ऑगस्ट |
| ३. | परीक्षा अर्ज भरणे | : | सप्टेंबर २०१३ |
| ४. | अंतिम लेखी परीक्षा | : | नोव्हेंबर/डिसेंबर २०१३ |
| ५. | निकाल | : | परीक्षेनंतर ४५ दिवसांनंतर |

### आशययुक्त अध्यापनपद्धती प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C-36)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश | : | १ जुलै २०१३ ते ३१ जुलै २०१३ |
| २. | मुख्य संपर्कसत्र | : | मे २०१३ |
| ३. | परीक्षा अर्ज भरणे | : | सप्टेंबर २०१३ |
| ४. | अंतिम लेखी परीक्षा | : | ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१४ |
| ५. | निकाल | : | परीक्षेनंतर ४५ दिवसांनंतर |

### मूल्यशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C-34)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश | : | १ जुलै २०१३ ते ३१ जुलै २०१३ |
| २. | मुख्य संपर्कसत्र | : | सप्टेंबर, नोव्हेंबर, मार्च २०१३ |
| ३. | परीक्षा अर्ज भरणे | : | मार्च २०१४ |
| ४. | अंतिम लेखी परीक्षा | : | मे २०१४ |
| ५. | निकाल | : | परीक्षेनंतर ४५ दिवसांनंतर |

**माहितीपुस्तिकेतील शिक्षणक्रमासाठी महत्त्वाच्या सूचना :**

०१. ही माहितीपुस्तिका अत्यंत महत्त्वाची आहे. अध्ययनार्थीने प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचावी व Online Download करून शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत सांभाळून ठेवावी.

०२. विद्यार्थ्याने एकदा प्रवेश घेऊन अर्ज भरल्यानंतर, अपात्र झाल्यास तसेच कोणत्याही परिस्थितीत शुल्क परत मिळणार नाही.

०३. संपूर्ण प्रवेश अर्ज Download करून झेरॉक्स प्रत विद्यार्थ्याने अर्ज अभ्यासकेंद्रावर देण्यापूर्वी स्वत:जवळ जपून ठेवावी व मूळ अर्ज दिल्यानंतर अभ्यासकेंद्राकडून पोच घ्यावी.

०४. विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्राच्या सतत संपर्कात राहावे, विद्यार्थ्यांच्या अडचणी अभ्यासकेंद्रावरच सोडविल्या जातील.

०५. विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज अभ्यासकेंद्राकडून विभागीय केंद्र/मुख्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांनी प्रवेश अर्जात नमूद केलेल्या विषयानुसार अभ्यासकेंद्रामार्फत पुस्तके वितरित होतील. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्राच्या संपर्कात राहावे.

०६. अध्ययनार्थींना एका वेळी केवळ दोनच शिक्षणक्रमास (म्हणजेच एक पदविका व पदवीप्रमाणे) प्रवेश घेता येईल.

०७. एकदा अध्ययनार्थीने प्रवेश घेतल्यानंतर कुठल्याही परिस्थितीत अभ्यासकेंद्र व विषय बदलून मिळणार नाही.

०८. विद्यार्थ्यांच्या नाव बदलाबाबत ज्या नावाने प्रवेश घेतलेला असेल त्याच नावाने प्रमाणपत्र मिळेल. जर नावात बदल करावयाचा असेल तर सोबत राजपत्र जोडण्यात यावे, मात्र प्रथम प्रवेश घेतानाच नाव बदलण्याची प्रक्रिया राजपत्रातील आदेशान्वये केली जाईल.

**प्रवेश प्रक्रिया :**

०१. १ जुलै २०१३ ते ३१ जुलै २०१३ पर्यंत प्रवेश प्रक्रिया होईल. त्यानंतर प्रवेश घेतल्यास खालीलप्रमाणे विलंब शुल्क आकारले जाईल.

**विलंब शुल्क :**

०१. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०१३ पर्यंत प्रमाणपत्र शिक्षणक्रमास १०० रु. विलंब शुल्क आकारण्यात येईल.

०२. १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१३ पर्यंत प्रमाणपत्र शिक्षणक्रमास २०० रु. विलंब शुल्क आकारण्यात येईल.

**टीप :** ०१. वेळापत्रकात प्रसंगी बदल होऊ शकतो. झालेला बदल त्या-त्या वेळी अभ्यासकेंद्रांना कळविला जातो. त्यासाठी अभ्यासकेंद्रांशी विद्यार्थ्यांनी सतत संपर्कात राहावे.

०२. विद्यार्थ्यांकडून प्रवेश-अर्ज मुख्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांनी प्रवेश-अर्जात नमूद केलेल्या विषयांनुसार अभ्यासकेंद्रामार्फत पुस्तके वितरित होतील. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्राच्या संपर्कात राहावे.

०३. **ही माहितीपुस्तिका अत्यंत महत्त्वाची आहे. अध्ययनार्थींनी शिक्षणक्रम पूर्णपणे यशस्वी होईपर्यंत किंवा कायमस्वरूपी आपल्या वैयक्तिक ग्रंथालयात/कपाटात/फाईलमध्ये सांभाळून ठेवावी ही आग्रहाची विनंती.**

**सूचना :** Online Download **केलेली माहितीपुस्तिका व** प्रवेश अर्जाची xerox प्रत विद्यार्थ्याने स्वत:जवळ मूळ अर्ज देण्यापूर्वी करून ठेवावी. मूळ अर्ज व चलनाचा भाग दिल्यानंतर केंद्राकडून झेरॉक्स प्रतीवर मिळाल्याची पोच घ्यावी.

Website : http://ycmou.digitaluniversity.ac

## १. विद्याशाखेचा परिचय

या विद्यापीठात एकूण आठ विद्याशाखा आहेत. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात शिक्षणशास्त्र विद्याशाखेची स्थापना झाली. त्यानंतर शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपले नाव संपूर्ण महाराष्ट्रात उज्ज्वल करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली. आज संपूर्ण महाराष्ट्र शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडे नेतृत्वाच्या दृष्टीने पाहतो. अद्ययावतता, गतिमानता आणि नवोपक्रमांचे स्वागत ही या विद्याशाखेची वैशिष्ट्ये.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपल्या कार्यास सुनिश्चितरित्या आणि गुणवत्ता राहावी या दृष्टीने विद्याशाखेचे गुणवत्ता धोरण, व्रतविधान आणि उद्दिष्टे निश्चित केली. त्या अनुषंगाने विद्याशाखेत प्रमाणपत्रापासून संशोधनापर्यंत अनेक शिक्षणक्रम टप्प्या-टप्प्याने सुरू झाले. विद्याशाखेच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात (१९९१) दूरशिक्षणाद्वारे बी. एड. शिक्षणक्रम सुरू करणारे संपूर्ण भारतातील हे पहिले मुक्त विद्यापीठ होय. त्यानंतर ह्या विद्याशाखेने अवघ्या दहा-पंधरा वर्षांत एम. फिल. शिक्षणशास्त्र (२००७), एम. फिल. शारीरिक शिक्षण (२००७), एम. एड. (१९९४), एम. ए. शिक्षणशास्त्र (२००७), बी.ए. (ई-एज्युकेशन : २००९) असे उच्च पदवी शिक्षणक्रम सुरू केले. एवढेच नव्हे तर विद्यापीठाच्या ध्येयास सुसंगत असे तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवणारे स्वयं-साहाय्य गट बांधणी (२००२), बालसेविका (२००२) यांसारखे प्रमाणपत्र शिक्षणक्रमही कार्यान्वित केले. शिक्षणाची गुणवत्ता वाढावी यासाठी मुख्याध्यापकांसाठी शालेय व्यवस्थापन पदविका तर माध्यमिक शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणांचे आयोजन केले. 'ज्ञानगंगा घरोघरी' पोहचवण्याच्या दृष्टीने संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात अभ्यासकेंद्रे स्थापन केली.

मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दूरशिक्षणाची असते, तर ह्या विद्याशाखेत प्रवेश घेणारे विद्यार्थी सेवांतर्गत असतात. ह्याचा विचार करून शिक्षणक्रमांची व त्यातील प्रात्यक्षिकांची रचना केली. प्रत्येक प्राप्त अनुभव वास्तविक स्तरावर पडताळून पाहता यावा यासाठी विशेष प्रात्यक्षिकांचे नियोजन केले. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व तज्ज्ञांच्या मदतीने मुद्रित-अमुद्रित साहित्य तयार केले. ह्या विद्याशाखेतील शिक्षणक्रम व्यावसायिक असतात. त्याचा विचार करता अभ्यासकेंद्रांवर शिक्षणक्रमातील विशिष्ट प्रात्यक्षिके मार्गदर्शनाखालीच करता यावी, त्याचा सराव व्हावा या दृष्टीने संपर्कसत्रांचे आयोजन केले.

मुक्त विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विद्याशाखा अनेकविध पुरस्कारांनी विभूषित आहे हे सांगण्यास आम्हाला आनंद होतो. आंतरराष्ट्रीय पुरस्कारात डॉ. अनंत जोशी, माजी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना COL कडून मिळालेला जीवनगौरव पुरस्कार, श्रीमती वानखेडे स्वाती, बी. एड., एम. एड. ची विद्यार्थिनी ह्यांना COL कडून मिळालेला Award of Excellence for D.E. ह्यांचा समावेश होतो. तसेच येथील प्राध्यापक वर्गासही राष्ट्रीय व राज्य पातळीवरील वैयक्तिक पुरस्कार मिळालेले आहेत.

## २. बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C31) : (Early Childhood Care & Education)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात बालसेविका प्रमाणपत्र शिक्षणक्रम २००२ मध्ये सुरू करण्यात आला. केंद्र शासनाने ९३ वी घटनादुरुस्ती करताना फक्त ६ ते १४ वर्षे वयोगटाच्या मुला-मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारलेली आहे. तथापि, अडीच ते साडेपाच वर्षे वयोगटाच्या बालकांच्या विकासाबाबत केंद्र शासन व राज्यशासन कोणत्याही प्रकारची निश्चित अशी जबाबदारी स्वीकारण्यास तयार नाही. त्यामुळे संपूर्ण देशात व महाराष्ट्र राज्यात देखील एकंदरीतच बालविकासाची अत्यंत हेळसांड होत आहे. बालशिक्षण क्षेत्रात जरी विविध प्रकारच्या संस्था विविध प्रकारे कार्यरत असल्या तरी त्यांच्या कार्यात एकवाक्यता व एकसूत्रता आढळून येत नाही अशी वस्तुस्थिती आहे. या परिस्थितीचा विचार करून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या संयुक्त विद्यमाने बालशिक्षण क्षेत्रात एकसूत्रता निर्माण व्हावी या उदात्त हेतूने प्रस्तुत बालसेविका प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरू केलेला आहे. त्यामुळे या शिक्षणक्रमात सहभागी होणाऱ्या, सेवेत असलेल्या व सेवेत नसलेल्या अशा सर्वांनाच बालविकासाचे शास्त्रीय ज्ञान व कौशल्य प्राप्त होण्याची संधी मुक्त विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेली आहे. आतापर्यंत या विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांसाठी अनेक विद्यार्थ्यांनी नावे नोंदविलेली आहेत. आपणदेखील आज त्यात सहभागी होत आहात ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. बालशिक्षण क्षेत्रात, बालविकासाच्या शास्त्रशुद्ध ज्ञानाची व कौशल्याची गरज लक्षात घेऊन या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या असंख्य बालसेविकांच्या प्रशिक्षणासाठी मुक्त विद्यापीठाने ही सुविधा महाराष्ट्रात प्रथमच उपलब्ध करून दिलेली आहे. प्रस्तुत शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर आपल्या कार्याचे आपणांस शास्त्रीय ज्ञान मिळून त्यामुळे निश्चितच बालविकासासाठी उपयोग करण्याचे कौशल्य प्राप्त होईल असा विश्वास मुक्त विद्यापीठास वाटतो. २००९ पासून ह्या शिक्षणक्रमाचे नामांतर बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम असे केलेले आहे. ह्या शिक्षणक्रमास आपण प्रवेश घ्यावा व शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करावा यासाठी आपणांस हार्दिक शुभेच्छा !

### शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

महाराष्ट्रात विविध शासकीय व अशासकीय संस्था बालशिक्षणाच्या क्षेत्रात अनेक वर्षे कार्यरत आहेत. मात्र या शिक्षणक्रमास शिकविणारे प्रशिक्षित

कार्यकर्ते पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नाहीत. अनेक खेड्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण न घेतलेल्या किंवा अल्प कालावधीचा प्रशिक्षण वर्ग पूर्ण करणाऱ्या व्यक्ती बालवाड्या चालवताना दिसतात. कोणतीही डी.एड. शिक्षिका कायमस्वरूपी 'बालवाडी शिक्षिका' म्हणून ग्रामीण भागात काम करण्यास फारशी उत्सुक नसते. तसेच काही ठिकाणी बालशिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या एखाद्या मध्यवर्ती संस्थेच्या पर्यवेक्षण व नियंत्रणाखाली इयत्ता आठवी ते इयत्ता दहावी पास मुली खेड्यांमध्ये बालशिक्षणाचे कार्य करतात. भारत सरकारच्या एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत निरनिराळ्या तालुक्यांतून अंगणवाड्या तसेच बालवाड्या चालविल्या जातात. येथे काम करणाऱ्या कार्यकर्त्या ह्या पूर्णत: दाई नसतात किंवा बालशिक्षिकाही नसतात. तर त्या प्रामुख्याने साहाय्यिकेचे कार्य करत असतात. म्हणून बालविकासावर भर देणारा एक शिक्षणक्रम विद्यापीठाने विकसित केला आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात ह्या कार्याला एकवाक्यता येईल आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने हा शिक्षणक्रम राबविता येईल. बालसेविका प्रमाणपत्र शिक्षणक्रम पुढील सर्वसामान्य उद्दिष्टाने विकसित करण्यात आलेला आहे.

(१) बालविकास क्षेत्रातील पाश्चात्त्य व भारतीय शिक्षणतज्ज्ञांच्या योगदानाचा अल्प परिचय विद्यार्थ्यांना करून देणे व त्यांच्या कार्याचे बालविकासाच्या दृष्टीने महत्त्व विद्यार्थ्यांवर बिंबविणे.

(२) बालविकासाच्या सर्वांगीण प्रक्रियेची मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रशिक्षणार्थ्यांना तोंडओळख करून देणे.

(३) बालविकासाच्या संदर्भात अध्ययनप्रक्रियेचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.

(४) बालकांचा आहार व आरोग्यासंदर्भात शास्त्रशुद्ध माहिती प्राप्त करून त्याचा बालविकासासाठी उपयोग करून घेण्यास मदत करणे.

(५) बालविकासाची तत्त्वे, बालविकास, मानसशास्त्र, आहार, आरोग्य ह्यांचे स्वरूप स्पष्ट करून त्या अनुषंगाने कार्यवाही व मूल्यमापनाची क्षमता प्रशिक्षणार्थ्यांत विकसित करणे.

(६) खेळवाडी व अंगणवाडी, बालवाडी, इत्यादींच्या आयोजनासाठी कार्यपद्धतीचे आवश्यक ते नियोजन व व्यवस्थापन ह्यांसंबधी मार्गदर्शन करणे.

(७) स्थानिक परिसर व उपलब्ध साधनसामग्रीसह परिणामकारक व कार्यक्षमतेने बालविकास केंद्र, खेळवाडी व तत्सम उपक्रम चालविण्याची क्षमता विकसित करणे.

(८) बालसंगोपन आणि रंजन शिक्षण कार्यकर्तीकडे आवश्यक असणाऱ्या वैशिष्ट्यांची जाणीव करून देणे.

## २.१ शिक्षणक्रमाची संरचना

(अ) अभ्यास विषय – ४

(आ) कालावधी – १२ महिने

(इ) एकूण श्रेयांक – १६ तात्त्विक – ४ श्रेयांक (प्रत्येक अभ्यास विषय १ श्रेयांक)

(ई) प्रात्यक्षिक – १२ श्रेयांक (प्रत्येक अभ्यास विषयांवर ३ श्रेयांकाचे प्रात्यक्षिक कार्य, आदी.

### ■ शिक्षणक्रमाचे स्वरूप

प्रस्तुत शिक्षणक्रमाचे दोन मुख्य भाग आहेत.

(अ) तात्त्विक भाग (आ) प्रात्यक्षिक भाग

### (अ) तात्त्विक भाग : पाठ्यक्रम (एकूण ४)

**EDU 131: बालविकासाची मूलतत्त्वे, बालविकास व बालमानसशास्त्र (Basic principles of child care education and psychology)**

**उद्दिष्टे**

(१) बालमानसशास्त्राचे स्वरूप, महत्त्व प्रशिक्षणार्थ्याला ज्ञात करणे.

(२) बालकाच्या विविधांगी विकासाच्या स्वरूपाचे (शारीरिक व कारक, बौद्धिक,भाषिक,भावनिक व सामाजिक सृजनशील आणि सौंदर्य) आकलन होण्यास प्रशिक्षणार्थ्यांस मदत करणे.

(३) बालकांना जाणून घेण्यासाठी निरीक्षण पद्धतीची कल्पना देऊन व्यक्तिभेद ओळखण्याची क्षमता आणि त्यांच्याविषयी आस्था प्रक्षिणार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

(४) बालकांना जाणून घेण्यासाठी निरीक्षण पद्धतीची माहिती देऊन त्यासंबंधीच्या नोंदी व त्यांचा उपयोग करण्याचे कौशल्ये प्रशिक्षणार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

(५) बालकांचा विकास, सहजप्रवृत्ती,गरजा इत्यादींचे शैक्षणिक कार्यक्रमाच्या आयोजनाच्या दृष्टीने प्रशिक्षणार्थ्यास महत्त्व स्पष्ट करणे.

घटक १ : बालविकास व बालमानसशास्त्र

घटक २ : बालशिक्षणाची मूलतत्त्वे आणि सिद्धांत

घटक ३ : सहजप्रवृत्ती, अध्ययन प्रक्रिया आणि बालकांचे शिक्षण

घटक ४ : बालकाचा शारीरिक व कारक विकास

घटक ५ : बालकाचा भाषिक विकास

घटक ६ : बालकाचा भावनिक व सामाजिक विकास

घटक ७ : बालकाचा सर्जनशील व सौंदर्यदृष्टीचा विकास

घटक ८ : बालकाचा बौद्धिक विकास

**EDU 132 : बालशिक्षण : बाल आहार व आरोग्य (Diet, Nutrition and health of child)**

**उद्दिष्टे**

(०१) बालकांच्या पोषणाचे स्वरूप व मूलतत्त्वे ह्यांची ओळख प्रशिक्षणार्थ्यांना करून देणे.

(०२) बालकांच्या आहाराचे महत्त्व व त्याप्रमाणे बालकांना खाण्याच्या चांगल्या सवयी लावण्यास प्रशिक्षणार्थ्यांना साहाय्य करणे.

(०३) बालकांसाठी चौरस आहार,त्याचे महत्त्व व त्याच्या घटकाची माहिती प्रशिक्षणार्थ्यांना करून देणे व तेच बालकाच्या मनावर बिंबवण्यास मदत करणे.

(०४) बालकांच्या शारीरिक गरजा ओळखून त्यानुसार पोषक आहाराबाबत निर्णय घेण्यास प्रशिक्षणार्थ्यांना मदत करणे.

(०५) बालकांमध्ये आरोग्य स्वच्छतेच्या सवयी बदलविण्याची क्षमता प्रशिक्षणार्थ्यांमध्ये विकसित करणे.

(०६) बालकाच्या आरोग्याविषयक सामान्य गरजा आणि प्रश्न समजून घेण्यास प्रशिक्षणार्थ्यांना साहाय्य करणे.

(०७) बालकांच्या पोषणाचे स्वरूप आणि मूलतत्त्वे यांची ओळख प्रशिक्षणार्थ्यांना देऊन त्याप्रमाणे खाण्याच्या सवयी बालकांना लावण्यास सांगणे व कुपोषित बालकांच्या लक्षणाची त्यांना ओळख करून देणे.

(०८) बालकांच्या आरोग्यविषयक सामान्य गरजा, निरीक्षण व नोंदी ठेवण्याची क्षमता प्रशिक्षणार्थींना देणे व स्वच्छतेसंबंधीची दैनंदिन तपासणी करण्यास तंत्र व पद्धतींचा परिचय करून देणे.

(०९) बाल्यावस्थेत होणाऱ्या सामान्य अपघात त्यावर प्रथमोपचाराची माहिती प्रशिक्षणार्थ्यांस देणे.

(१०) बालकांच्या आहार व आरोग्यविषयी पालकांशी संपर्क साधण्याची कौशल्ये प्रशिक्षणार्थ्यांमध्ये विकसित करणे.

घटक १ : बालकाचे आरोग्य

घटक २ : बालकाचा आहार

घटक ३ : बालकाची शारीरिक वाढ व मानसिक आरोग्य

घटक ४ : बालकाच्या आरोग्य व आहाराशी संबंधित सवयी व वर्तने

घटक ५ : बालकाची, परिसराची व अन्नपाण्याची स्वच्छता

घटक ६ : बालकाचे नेहमीचे आजार

घटक ७ : अपघात आणि प्रथमोपचार

घटक ८ : बालकांची वैद्यकीय तपासणी व्यंगासंबंधी पालकसंपर्क

| | *गृह प्रात्यक्षिके* | *अभ्यासकेंद्र संपर्कसत्र प्रात्यक्षिके* | *कार्यस्थळ प्रात्यक्षिके* | *एकूण* |
|---|---|---|---|---|
| सैद्धांतिक भागाशी संबंधित प्रात्यक्षिके | २ ( प्रत्येक अभ्यासक्रमास १/२ श्रेयांक) (६० ते ७० तास) | ०.२५ श्रेयांक (७ ते ८ तास) | १/२ + १/२ श्रेयांक किंवा ३/४ श्रेयांक (३० ते ३५ तास) | ३ श्रेयांक (९०–१०५ तास) |
| स्वतंत्र प्रात्यक्षिके | – | २.७५ ते ३ श्रेयांक (९० ते १०५ तास) | ६ श्रेयांक (१८० ते २१० तास) | ९ श्रेयांक (२७० ते ३१५ तास) |
| एकूण | २ श्रेयांक (६० ते ७० तास) | ३ श्रेयांक (९० ते १०५ तास) | ७ श्रेयांक (२१० ते २४५ तास) | १२ श्रेयांक (३६० ते ४२० तास) |

Website : http://ycmou.digitaluniversity.ac

**EDU 133 : बालशिक्षण कार्यपद्धती**
**(Functioning of child Education)**

**उद्दिष्टे**

(१) स्थानिक, भौतिक व सामाजिक परिस्थितीनुसार योग्य कार्यपद्धतीची निवड करण्यास प्रशिक्षणार्थ्यांत क्षमता निर्माण करणे.

(२) बालविकासाच्या विविध अंगांवर आधारित विविध कृतींचे परिणामकारक नियोजन, आयोजन करण्याची क्षमता प्रशिक्षणार्थीत निर्माण करणे.

(३) बालकामध्ये उपयुक्त व परिणामकारक पद्धतीने अध्ययन करण्याची क्षमता प्रशिक्षणार्थीत विकसित करणे.

(४) प्रशिक्षणार्थिंना विद्यार्थ्यांच्या आहार व पोषणाची काळजी घेण्यास व त्यासंदर्भात कृतींची निवड करण्यास सक्षम बनविणे.

(५) सहकाऱ्यांनी व अन्य बालविकास केंद्रावर निवडलेल्या कार्यक्रमांची योग्य, अयोग्यता ठरविण्याची क्षमता प्रशिक्षणार्थ्यांत विकसित करणे.

घटक १ : बालशिक्षण कार्यपद्धतीचे मार्गदर्शक तत्त्वे

घटक २ : शारीरिक व कारक विकासासाठी कार्यपद्धती

घटक ३ : भाषिक विकासासाठी कार्यपद्धती

घटक ४ : सामाजिक, भावनिक आणि सहजप्रवृत्तीच्या विकासा- साठी कार्यपद्धती

घटक ५ : जीवन व्यवहाराची कार्यपद्धती

घटक ६ : सर्जनशीलतेच्या विकासासाठी कार्यपद्धती

घटक ७ : कलानुभवाची कार्यपद्धती

घटक ८ : विज्ञान व परिसर अभ्यासासाठी कार्यपद्धती

**EDU 134 : बालशिक्षणाचे व्यवस्थापन व मूल्यमापन**
**(Organisation and evaluation of child education)**

**उद्दिष्टे**

(१) बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या प्रशिक्षणार्थ्यांना व्यवस्थापनात कसे सहभागी व्हावे हे सांगणे.

(२) प्रशिक्षणार्थ्यांनी निरीक्षणविषयक तक्ते तयार करण्याची आणि त्यात नियमित नोंदी करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

(३) प्रशिक्षणार्थ्यांना बालशिक्षण केंद्राचे दैनिक, घटक, वार्षिक नियोजन करण्यासाठी मार्गदर्शन करून माहिती देणे.

(४) प्रशिक्षणार्थ्यांना पालक व समाज यांचेशी संपर्क व त्यांचे सहकार्य मिळविण्यासंबंधी विविध कार्यक्रम व उपाययोजना सुचविणे.

(५) प्रशिक्षणार्थ्यांना परिसर, शाळा व शाळेतील भौतिक साहित्य यांची काळजी कशी घ्यावी हे सांगणे.

(६) प्रशिक्षणार्थ्यांना विद्यार्थ्यांचे अंतर्गत व साकरिक अंतिम मूल्यमापन करण्याचे तंत्र सांगणे.

घटक १ : केंदाचे व्यवस्थापन व संघटन

घटक २ : भौतिक सुविधा व परिसर

घटक ३ : साहित्य निर्मिती, देखभाल व दुरुस्ती

घटक ४ : केंद्रातील विविध अभिलेख, फाईल व नोंदी

घटक ५ : मानवी संबंध

घटक ६ : व्यापक नियोजन

घटक ७ : अल्पकालीन शैक्षणिक नियोजन

घटक ८ : मूल्यमापन

### (आ) प्रात्यक्षिक भाग

यामध्ये एकूण तीन भाग आहेत. (१) गृह प्रात्यक्षिके (२) अभ्यास केंद्र संपर्कसत्र प्रात्यक्षिके आणि (३) कार्यस्थळ (क्षेत्रीय) प्रात्यक्षिके तात्त्विक भागाशी संबंधित ३ श्रेयांकाची प्रात्यक्षिके असून स्वतंत्र प्रात्यक्षिके एकूण १२ श्रेयांकांची आहेत. याप्रमाणे एकूण १२ श्रेयांकांची प्रात्यक्षिके आहेत. त्याचा तपशील खालील तक्त्यात दाखविण्यात आलेला आहे.

## २.२ अध्ययन पद्धती

प्रस्तुत शिक्षणक्रमासाठी विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रामार्फत प्रशिक्षणार्थींना स्वयं-अध्ययन साहित्य पुरविण्यात येईल. या शिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं-अध्ययनाची असली तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे तात्त्विक पाठयक्रमांचे मार्गदर्शन, आशयाचे शंकानिरसन, प्रात्यक्षिके, इत्यादी मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानुसार पूर्ण करावयाची आहेत. स्वाध्याय लेखनानंतर चर्चा, कृतिसत्रे, उद्‌बोधन, प्रबोधन, इत्यादींसाठी संपर्कसत्रे आयोजित केली जातील. त्याबाबत सविस्तर तपशील वेळोवेळी पत्राने अभ्यासकेंद्रांना कळविण्यात येईल व अभ्यासकेंद्रामार्फत अध्ययनार्थींना कळविले जाईल. याशिवाय महाराष्ट्रातून वेगवेगळ्या भागातून आलेल्यांचे अभ्यासगट करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

### संपर्कसत्राचे आयोजन व प्रशिक्षणार्थींची उपस्थिती

बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं-अध्ययनाची असली तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे त्याच्या सर्व प्रकारच्या कार्यासाठी योजनाबद्ध संपर्कसत्राची आवश्यकता आहे. ही संपर्कसत्रे विद्यापीठाने काळजीपूर्वक निवडलेल्या

अभ्यासकेंद्रावर आयोजित होतील. राज्यातील प्रतिथयश बालशिक्षण संस्थांची अभ्यासकेंद्र म्हणून निवड केलेली आहे. या विद्यापीठाने तयार केलेल्या वेळापत्रकानुसार संपर्कसत्रांचे आयोजन करण्यात येईल. संपर्कसत्रातील विषयतज्ज्ञांची उपस्थिती व सहभाग अत्यावश्यक समजला जाईल. त्याचप्रमाणे संपर्कसत्रात शिक्षणक्रमाचा तात्त्विक भाग, शिक्षणातील व्यवहार व प्रात्यक्षिके यांमधील परस्परसंबंध राखता यावा, तत्त्वांचा, व्यावहारिक उपयोजनांचा कार्यभाग सहजपणे शक्य व्हावा, व्यवहारातून तत्त्वांची संकल्पना दृढ व्हावी या पद्धतीने संपर्कसत्रांचे वेळापत्रक व आयोजन करण्यात येते.

## २.३ प्रवेश प्रक्रिया

### प्रवेश पात्रता

### (अ) शैक्षणिक अर्हता

(१) उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण **किंवा**

(२) मुक्त विद्यापीठाची पूर्वतयारी प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण **किंवा**

(३) स्वयं साहाय्य प्रेरक–प्रेरिका (S.H.G.) परीक्षा उत्तीर्ण **किंवा**

(४) इतर विद्यापीठात बी. ए./बी. कॉम./ बी. एस्सी. करणारे विद्यार्थी ह्या शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यास पात्र आहेत.

### (आ) अनुभव

बालशिक्षण/बालसंगोपन क्षेत्रात किमान एक वर्षाचा अनुभव असणाऱ्या व्यक्ती प्रवेश पात्रता S.S.C. पास असली तरी चालेल.

### (इ) वय

(१) किमान १८ वर्षे पूर्ण असणारी व्यक्ती (महिला किंवा पुरुष)

### (ई) प्रवेश निवड

पात्र व्यक्तीस प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश या तत्त्वानुसार अध्ययनार्थीस प्रवेश देण्यात येईल. (अभ्यास केंद्र सुरू ठेवण्यासाठी किमान **१०** अध्ययनार्थीस प्रवेश दिलेला असावा. मात्र त्यांची परीक्षा विद्यापीठाच्या नियमानुसार जवळच्या केंद्रावर घेण्यात येईल.)

## २.४ शिक्षणक्रम शुल्क

| | | |
|---|---|---|
| १ | विद्यापीठ शुल्क | रु. ९२५/– |
| २ | अभ्यासकेंद्र शुल्क | रु. ५७५/– |
| | **एकूण शुल्क** | **रु. १५००/–** |

### (अ) विद्यापीठ शुल्काची विभागणी

| | | |
|---|---|---|
| १. | प्रवेश व नोंदणी शुल्क | रु. १३५/– |
| २. | शैक्षणिक शुल्क | रु. ३६०/– |
| ३. | संवाद शुल्क | रु. ५०/– |
| ४. | ओळखपत्र शुल्क | रु. ३०/– |
| ५. | आपत्कालीन शुल्क | रु. १०/– |
| ६. | विद्यार्थी कल्याण शुल्क | रु. ४०/– |
| ७. | परीक्षा शुल्क | रु. २००/– |
| ८. | गुणपत्रिका शुल्क | रु. १००/– |
| | **एकूण** | **रु. ९२५/–** |

(आ) विद्यापीठ शुल्काची रक्कम विद्यापीठाने निर्धारित केलेल्या बँकेतच चलनाद्वारे भरावी . चलनाच्या ३ प्रतींपैकी एक प्रत (A) बँक ठेवून घेईल. एक प्रत (B) विद्यार्थ्याने प्रवेश–अर्जासोबत जोडावी. एक प्रत (C) स्वत:जवळ ठेवावी. बँक सेवाशुल्क चलनात नमूद केलेले असल्यास ते भरावे लागेल. तसेच प्रवेश–अर्जाची झेरॉक्स प्रत स्वत:जवळ जतन करावी.

(इ) अभ्यासकेंद्र शुल्काची रक्कम विद्यार्थ्याने अभ्यासकेंद्रावर जमा करावी व पावती घ्यावी.

### विशेष सूचना

(अ) नियमीत विद्यार्थ्यांची विद्यापीठ शुल्कात परीक्षा शुल्क अंतर्भूत आहे. त्यामुळे त्यांना परीक्षा वेगवेगळी भरण्याची आवश्यकता नाही. पुर्नपरीक्षार्थी अध्ययनार्थींनी मात्र प्रत्येक अभ्यासक्रमासाठी (विषयासाठी) रुपये १२५/– व गुणपत्रक, टपालसहीत रु.१००/– प्रमाणे शुल्क भरावे लागेल.

(आ) विद्यापीठ शुल्क रोख रक्कम (कॅश), मनी ऑर्डर, चेक किंवा सहकारी बँकेचा डी.डी. स्वीकारला जाणार नाही.

### अतिमहत्त्वाचे

(इ) अध्ययनार्थीने प्रवेश शुल्क एकदा भरल्यानंतर कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास शुल्क परत केले जाणार नाही.

## २.५ कालावधी

प्रस्तुत शिक्षणक्रम दूरस्थ अध्यापनपद्धतीद्वारे आयोजित केला जाणार असून नोंदणीपासून परीक्षेपर्यंतचा कालावधी १ वर्षाचा राहील. नापास/अनुपस्थित असणाऱ्यास प्रवेशापासून ३ वर्षांत हा शिक्षणक्रम रु. २००/–प्रतिदिवस अतिरिक्त शुल्क भरून करता येईल.

### संपर्कसत्र कालावधी

एकूण १४ दिवस रोज घड्याळी ६ तासाप्रमाणे एकूण ८४ तास उद्‌बोधनसत्र २ दिवस (शिक्षणक्रमाचे स्वरूप व साहित्य वाटप, इत्यादी) प्रथम संपर्कसत्र ६ दिवस व द्रितीय संपर्क सत्र ०६ दिवस

**संपर्कसत्राचा कार्यक्रम व उपस्थिती**

या शिक्षणक्रमासाठी अभ्यासकेंद्रावर एकूण तीन संपर्कसत्रे घेण्यात येतील.

**(१) उद्‌बोधन (०२ दिवस) (ऑगस्ट प्रथम आठवडा)**

या संपर्कसत्रात मुक्त विद्यापीठ, विद्यापीठातील विविध शिक्षणक्रम, अभ्यासकेंद्र इत्यादी संदर्भात माहिती आणि सर्व अभ्यास विषयांची ओळख करून देण्यात येईल. तसेच पुढील कार्यक्रमाचा परिचय करून देण्यात येईल.

**(२) प्रथम संपर्कसत्र (०६ दिवस) (सप्टेंबर/ऑक्टोबर)**

ह्या संपर्कसत्रात केंद्रावरील तज्ज्ञ समंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली काही प्रात्यक्षिके कार्ये पूर्ण करून घेतले जाईल आणि सर्व सैद्धांतिक विषयाचे समंत्रण होईल. तसेच पहिल्या संपर्कसत्रानंतर पुढील संपर्कसत्राविषयी, करावयाच्या कामाविषयी माहिती देण्यात येईल.

**(३) द्वितीय संपर्कसत्र (०६ दिवस) (फेब्रुवारी)**

दुसऱ्या संपर्कसत्रात पूर्वी केलेली प्रात्यक्षिके व त्यानंतर घरी केलेल्या प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन होईल. यात अहवाल व स्वाध्याय सादरीकरण होईल. पुन्हा समंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली काही प्रात्यक्षिके व समंत्रण, प्रात्यक्षिकाच्या मौखिक परीक्षेविषयी माहिती, परीक्षेची तयारी ह्याविषयी मार्गदर्शन करण्यात येईल.

**माध्यम**

विद्यापीठाने संपूर्ण अध्ययन–साहित्य हे मराठी भाषेत तयार केलेले आहे. त्यामुळे संपूर्ण शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी भाषा राहील. संपर्कसत्रांचे माध्यम मराठी राहील, तसेच प्रात्यक्षिक कार्यदेखील मराठी माध्यमातून पूर्ण करावे लागेल. तथापि, अपवाद म्हणून ज्या प्रशिक्षणार्थींना प्रात्यक्षिकाकरिता इंग्रजी माध्यम अधिक सोयीचे असेल त्यांना केवळ उत्तरे हिंदी/इंग्रजीतून लिहिण्यासाठी पूर्व परवानगीने देण्यात येईल. अशा प्रशिक्षणार्थींना अंतिम परीक्षेतदेखील हिंदी/इंग्रजीतून उत्तरे लिहिण्याची पूर्व परवानगीने एका माध्यमाचा वापर करता येईल.

**फायदे/उपयोग**

(१) आपली स्वतःची बालवाडी, अंगणवाडी, खेळवाडी, पाळणाघर, किंडरगार्टन व्यवस्थित शास्त्रीय पद्धतीने चालवता येईल. (२) बालवाडी, अंगणवाडी, खेळवाडी, पाळणाघर, किंडरगार्टन, इत्यादी ठिकाणी शिक्षिका/बालवाडी ताई, बालसेविका म्हणून नोकरी मिळेल. (३) मुक्त विद्यापीठाच्या बी.एड. शिक्षणक्रम प्रवेशासाठी २ गुण अधिकचे दिले जातील. (४) महिला व बालकल्याण क्षेत्रात पदवीधर व्यक्तीस समन्वयक, पर्यवेक्षक व अधिकारी होण्यासाठी प्राधान्य दिले जाईल. (५) आदर्श आई–बाबा, आजी–आजोबा होण्यासाठीही हा शिक्षणक्रम सर्वांच्या उपयोगाचा आहे. तरी इच्छुकांनी सुवर्णसंधीचा आवश्य लाभ घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे व आदर्श बालसंगोपनाचे स्वप्न साकार करावे. लक्षात ठेवा, मुक्त विद्यापीठाचे शिक्षण म्हणजे अधिक दर्जेदार व वेगळ्या पद्धतीने आपणास शिकण्याची दुसऱ्यांदा प्राप्त झालेली सुसंधी आहे. मुक्त विद्यापीठातील शिक्षण विकासाचे लक्षण !

## २.६ मूल्यमापन प्रक्रिया

(१) हा शिक्षणक्रमाचा एकूण १००० गुणांचा आहे.

(२) याप्रमाणे प्रस्तुत शिक्षणक्रमात लेखी परीक्षेसाठी ४०० गुण व प्रात्यक्षिक कार्यासाठी ६०० गुण असे एकूण १००० गुणांचे मूल्यमापन होणार आहे.

(३) एकूण अभ्यास विषय ४ असून प्रत्येक अभ्यास विषयास १०० गुण याप्रमाणे तात्त्विक भागावर एकूण ४०० गुणांची अंतिम लेखी परीक्षा आयोजित केली जाणार आहे.

(४) ह्यामध्ये स्वाध्याय अभ्यासकेंद्रावरील प्रात्यक्षिके व गृहप्रात्याक्षिके व मौखिक परीक्षांचा समावेश केलेला आहे. स्वाध्यायांचा समावेश अभ्यासकेंद्र संपर्कसत्र प्रात्यक्षिकात करण्यात आला असून प्रत्येक विषयावर २५ गुणांचा एक स्वाध्याय याप्रमाणे ४ विषयांवर एकूण १०० गुणांचे ४ स्वाध्याय असतील.

### (अ) अंतर्गत मूल्यमापन

अंतर्गत मूल्यमापन प्रात्यक्षिक कार्याचे मूल्यमापन केले जाणे अपेक्षित आहे. यात गृह आणि क्षेत्रीय प्रात्यक्षिकांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे चार सैद्धांतिक विषयांवर आधारित स्वाध्यायसुद्धा प्रात्यक्षिकातच समाविष्ट केलेले आहेत. वर्षाच्या शेवटी सर्व प्रात्यक्षिकांच्या सादरीकरणाच्या वेळी घेण्यात येणारी 'मौखिक परीक्षा' ही अंतर्गत मूल्यमापनाचाच एक भाग आहे. अंतर्गत मूल्यमापन एकूण ६०० गुणांचे आहे. ह्या संबंधीचा प्रात्यक्षिक कार्य – गुणदान तक्ता परिशिष्टात देण्यात आलेला आहे.

### (आ) बहिःस्थ मूल्यमापन

बहिःस्थ मूल्यमापनात चार विषयांवर प्रत्येकी १०० गुणांची अंतिम 'लेखी परीक्षा' अंतर्भूत आहे. प्रत्येक विषयाच्या प्रश्नपत्रिकेचे दोन भाग असतात. एक भाग वस्तुनिष्ठ प्रश्नांचा – ३० गुणांचा असतो, तर दुसरा भाग दीर्घ आणि लघूत्तरी प्रश्न – ७० गुणांचा असतो. यात किमान १० ते १५ टक्के प्रश्न उच्च विचार प्रक्रियेवर आधारित असतात.

वस्तुनिष्ठ प्रश्नपत्रिकेसाठी ३० मिनिटे आणि ३० गुण निर्धारित असतात. ही प्रश्नपत्रिका आधी दिली जाते. निर्धारित वेळेच्या नंतर ती प्रश्नपत्रिका गोळा केली जाते आणि दुसरा भाग दिला जातो. प्रत्येक प्रश्नपत्रिकेसाठी एकूण ३ तास दिले जातात. ही अंतिम परीक्षा साधारणतः 'मे' महिन्यात परीक्षा केंद्रावर घेण्यात येते.

## (इ) उत्तीर्णतेचे नियम

(१) संपर्कसत्रांना ८० टक्के उपस्थिती आवश्यक असेल, त्याशिवाय अंतिम परीक्षेला बसता येणार नाही.

(२) प्रत्येक पाठ्यक्रमाचे स्वाध्याय (सादरीकरणासह) आणि प्रात्यक्षिक यांत ५०% गुण प्राप्त होणे आवश्यक आहे.

(३) प्रत्येक पाठ्यक्रमात उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५०% गुण आवश्यक आहे.

(४) प्रात्यक्षिके व स्वाध्याय आणि अंतिम लेखी परीक्षेतील गुण यांवरून एकत्रित टक्केवारी काढण्यात येईल. त्यानुसार प्रथम, द्वितीय व तृतीय श्रेणी देण्यात येईल.

$$\text{शिक्षणक्रमाची टक्केवारी} = \frac{\text{प्राप्त गुण}}{\text{एकूण गुण}} \times १००$$

मिळालेल्या टक्केवारीला खालील तक्त्याप्रमाणे वर्गात रूपांतरित केले जाईल.

**गुणांकन विभाजन**

| गुणांची टक्केवारी | श्रेणी | वर्ग |
|---|---|---|
| ७५% पेक्षा अधिक | ओ | विशेष प्रावीण्य |
| ६०% ते ७४.९९% | ए | प्रथम |
| ५०% ते ५९.९९% | बी | द्वितीय |
| ५०% पेक्षा कमी | सी | तृतीय |

### अंतिम लेखी परीक्षेचे स्वरूप

प्रत्येक सैद्धान्तिक विषयासाठी १०० गुणांची प्रश्नपत्रिका असेल. त्याचे दोन विभाग असतील. विभाग एक हा ७० गुणांचा असेल. त्यात दीर्घोत्तरी आणि लघुत्तरी प्रश्नांचा समावेश असेल. त्यासाठी

## २.७ अभ्यासकेंद्र

टीप : 2012-13 मधील प्रवेशित अभ्यासकेंद्र ★

2013 मधील नवीन अभ्यासकेंद्र ★★

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | अ.क्र. | ठिकाण | केंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्राचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **अमरावती विभाग** | | | | |
| 1 | **अमरावती** | 1★ | अमरावती | 12123 | श्री. दादासाहेब तारे च्यारीटेबल ट्रस्ट, अचलपूर, वैनतेय विद्यालय सुलतानपूरा रोड, अचलपूर, जि. अमरावती 07223-250289, Shripad.tare@gmail.com |
| | | 2★ | अमरावती | 1298A | महिला स्वयं सेवी शिक्षण संस्था , बालाजी प्लॉट, गोपाल प्रभा मंगल कार्यालया शेजारी, जि. अमरावती 0721-2578563 |
| | | 3★ | वाशिम | 1220A | श्री. तुळशीराम जाधव कला महाविद्यालय, सोनखास रोड, लाखाळा, वाशिम, जि. वाशिम - 444505 Stjkm.washim@gmail.com |
| | | 4★ | वाशिम | 1514A | यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ एज्युकेशन, मंगरूळपीर, जि. वाशिम, जि. वाशिम - 9763009452 |
| | | 5★ | यवतमाळ | 1410A | गुणवंतराव देशमुख एज्युकेशन कॉलेज, पुसद, जि. यवतमाळ. 07232-241189/9423134910 |
| | | 6★ | यवतमाळ | 1476A | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ डिस्टन्स, गांधी नगर, चर्चजवळ, यवतमाळ, जि. यवतमाळ. 07232-241189/ 9423134910 |
| | | 7★ | यवतमाळ | 1473A | त्यागी सेवा मंडळ, गांधीनगर, चर्च जवळ, यवतमाळ, जि. यवतमाळ. 1473A |
| | | 8★ | बुलढाणा | 1398A | प्रतिमा क्रियोटीव्ह बहुउद्देशीय संस्था, द्वारा-डॉ. मानू, सिव्हील लाईन, खामगाव, जि. बुलढाणा-444303, 0763ह253145 |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | अ.क्र. | ठिकाण | केंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्राचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | 9★★ | बुलढाणा | 13104 | श्री. विलासराव देशमुख, डी.टी.एड. कॉलेज, निवाणा, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा. मो.9850371891 |
| | | 10 | सिंदखेड | 13521 | नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबीड, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा. मो.9823311684/07269263579 |
| | | 11 | दर्यापूर | 12170 | श्री तुळसीराम सिंह रघुवंशी शिक्षणसंस्था, येवदा, ता. दर्यापूर जि. अमरावती - 444706 |
| **2** | **औरंगाबाद** | | | | |
| 1 | **औरंगाबाद** | 1★ | औरंगाबाद | 21168 | सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ, द्वारा-डॉ. हेडगेवार रुग्रालय, जवाहर कॉलनी, गारखेडा, औरंगाबाद - 431005, संपर्क : 9422708333/9423190060 |
| | | 2★ | औरंगाबाद | 21187 | मातोश्री डॉ. कंचन शांतीलाल देसरडा, इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन, डी.के.एम.एम. मेडीकल कॉलेज कॅम्पस, गुरूगणेश नगर, पहाडसिंगपुरा, औरंगाबाद - 431004, 0240-2242541 |
| | | 3★ | बीड | 2256A | प्रतिभा शिक्षण संस्था श्री शारदाचार्य विद्यामंदिर मितरानगर, बीड, जि. बीड. 02442-225575 |
| | | 4★ | बीड | 2267A | मानवलोक होम सायन्स कॉलेज अंबेजोगाई, जि. बीड 9422244155/9545579926 |
| | | 5★ | बीड | 2274A | आदर्श महिला कॉजेल ऑफ एज्युकेशन, खडकपूर पेठ, जि. बीड 9822504738/9405294555 |
| | | 6★ | बीड | 2270A | योगेश्वरी कॉलेज ऑफ एज्युकेशन, जळगाव रोड, करी, ता. धारूर, जि. बीड. मो. 9472534364/9420652611 |
| | | 7★ | जालना | 2341A | स्वामी विवेकानंद वरीष्ठ महाविद्यालय, मंठा, ता. मंठा जि. जालना. 431504, 9423459192/9423459192 |
| | | 8★ | जालना | 2321A | वसंतराव नाईक अध्यापक कॉलेज ऑफ एज्युकेशन छत्रपती कॉलनी, जालना, ता. जालना, जि. जालना मो. 9422219821/9421648320 |
| | | 9 | जालना | 2348A | आनंद प्राथमिक शाळा, बस स्टँड, बायपास रोड, परतुर, जि. जालना-431504. मो. 8149492655/90280334059 |
| | | 9 | उस्मानाबाद | 2651A | विकास सामाजिक व शैक्षणिक संस्था, इंदापुरकर बिल्डींग, बी अँड सी. क्वार्टर समोर, कोहीनुर हॉटेल पाठीमागे, आनंदनगर उस्मानाबाद - 413501/8806666101 |
| | | 10 | उस्मानाबाद | 2657A | रहेबर एज्युकेशन व वेलफेअर सोसायटी, शिराढोणा, ता. कळंब, जि. उस्मानाबाद. मो.9423339671 |
| **3** | **मुंबई विभाग** | | | | |
| 1 | **मुंबई** | 1 | डोंबिवली | 31307 | राष्ट्रीय शिक्षण संस्था, राणा प्रताप भवन, दिनदयाल डोंबिवली ता. जि. मुंबई (प.) - (02512) संपर्क : 410113/9820386936 |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | अ.क्र. | ठिकाण | केंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्राचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | 2★ | अंधेरी (पू.) | 13339 | यश एज्युकेशन ट्रस्ट, डायस हाऊस, 02, कोडीविटारोड साईहनुमान मंदिर, जे.बी. नगर, अंधेरी (पू) मुंबई - 400 059 संपर्क : 9820870624/9987384712 |
| 2 | **ठाणे विभाग** | 1 | तलासरी | 35208 | गोदावरी शामराव परूळेकर महाविद्यालय मु.पो. ता. तलासरी, जि. ठाणे |
| | | 2★ | कल्याण | 35288 | एस.व्ही.पी. एज्युकेशन ट्रस्ट, निवार कॉम्प्लेक्स, आय.डी.बी.आय. बँकेजवळ, मोडक गल्ली टिळक चौक, कल्याण (प), जि. ठाणे 421301/0251-2022303/9763636281 |
| | | 3 | ठाणे | 35292 | गुडविल इंटरनॅशनल फाऊंडेशन, डीडीएम स्कूल व ज्यु. कॉलेज चराई, ठाणे -400601. मो.02225437877/ 9821468086 |
| **4** | **नागपूर विभाग** | | | | |
| 1 | **भंडारा** | 1★ | गणेशपूर | 4128 A | मानव धरम शिक्षा, क्रीडा प्रसारण व समस्या निवारण ट्रस्ट, गणेशपूर ता. भंडारा, जि. भंडारा. संपर्क : 8888490184/9270458227 |
| 2 | **चंद्रपूर** | 1★ | उर्जानगर नेरी | 4281 A | धोटे एज्युकेशन सोसायटी उर्जानगर, नेरी ता. चंद्रपूर. संपर्क : 07172 - 260475/9890667223 |
| 3 | **गडचिरोली** | 1★ | गडचिरोली | 4302 A | ॲड. एस. एन. गंगुवार कॉलेज ऑफ एज्युकेशन, गडचिरोली जि. गडचिरोली. संपर्क : 07132-232221/233453 |
| | | 2★ | आरमोरी | 4321 A | किशनराव खोबरागडे शिक्षण महाविद्यालय, बस स्टँड रोड, आरमोरी, जि. गडचिरोली. संपर्क : 07137-266784/ 9422144150 |
| | | 3★ | गडचिरोली | 4322 A | श्री. किशनराव खोबरागडे शिक्षण महाविद्यालय, मूलरोड गडचिरोली, जि. गडचिरोली. संपर्क : 07132-233211/ 9421730423 |
| 4 | **नागपूर** | 1★ | पारशीवनी | 44250 | पालीवाल बी.एड. कॉलेज पारशीवनी, नागपूर, जि. नागपूर. संपर्क : 0712-2744965/9422344640 |
| | | 2★ | सावरगाव | 4714 A | यशवंतराव पाटील राऊत अध्यापक कॉलेज, मु.पोस्ट, सावरगाव ता. नारखेड, जि. नागपूर. संपर्क: 9823350544/9923859070 |
| | | 3 | नागपूर | | पंचशील प्लॉट नं.41, जोशीवाडी, कौशल्याकुंज, स्पोर्टिंग, नागपूर संपर्क : 9373104220 |
| 5 | **वर्धा** | 1 | वर्धा | 4502 A | यशवंत महाविद्यालय, सेवाग्राम रोड, वर्धा जि. वर्धा - 442 001. संपर्क : 07152-243120/ 9423421025 |
| ५ | **नाशिक विभाग** | | | | |
| 1 | **अहमदनगर** | 1★ | श्रीरामपूर | 51117 | आधार ग्रामीण सामाजिक विकास संशोधन संस्था सी-1, साई रेसिडन्सी, नियर हॉटेल उदय पॅलेस, नेवासा रोड, श्रीरामपूर, जि. अहमदनगर. संपर्क : 9860268260/ 8605286343 |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | अ.क्र. | ठिकाण | केंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्राचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | 2 | राजूर | 51149 | स्वामी समर्थ सेवा संस्था<br>राजूर, ता. अकोले, जि. अहमदनगर. संपर्क : 9423749944 |
| | | 3★ | करोडी | 51152 | जवाहर ज्युनियर कॉलेज, मु. पोस्ट, करोडी<br>चिंचापुरी, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर<br>संपर्क : 9763148486/9371730913<br>Shaikh_Balam@rediffmail.com |
| | | 4 | जामखेड | 51159 | छत्रपती शिवाजी महाराज शिक्षणशास्त्र महाविद्यालय<br>जामखेड, जि. अहमदनगर.<br>संपर्क : 02421-221968/9822325653 |
| 2 | **धुळे** | 1★ | पिंपळनेर | 5284A | एम.व्ही. मराठे बी. एड. कॉलेज, पिंपळनेर, ता. साक्री<br>जि. धुळे. संपर्क : 9922202116/02561-225151 |
| | | 2★ | कुंडाणे | 5296A | अभय युवा कल्याण केंद्र संचालित, डी.टी.एड. कॉलेज<br>मु.पो. कुंडाणे, (वरखेडे), ता. जि. धुळे -424301<br>संपर्क : (02562-230512)/9822616258 |
| | | 3★ | शिरपूर | 52118 | भारतरत्न डॉ. बाबासाहेब शैक्षणिक व बहुउद्देशीय संस्था<br>शिरपूर, पित्रेश्वर कॉलनी, प्लॉट नं.52 ब, शिरपूर,<br>जि. धुळे -8888507880 |
| 3 | **जळगाव** | 1★ | जळगाव | 5310A | खांदेश एज्युकेशन सोसायटी, कॉलेज ऑफ एज्युकेशन<br>कॉलेज कॅम्प्स जळगाव, जि. जळगाव<br>संपर्क : (02580) 2234187, 9923289513/<br>9689786316 |
| | | 2★ | जळगाव | 53110 | दिशा फाऊंडेशन, पाटीलवाडी, एस.बी.आय. बँकेमागे, वाकीरोड<br>जामनेर, जि. जळगाव |
| | | 3 | शेंदुर्णी | 53132 | शेंदुर्णी शिक्षणसंस्था, शेंदुर्णी, ता. जामनेर, जि. जळगाव<br>संपर्क : (02580) 252246/9228725529 |
| | | 4★ | जळगाव | 53139 | खांदेश कॉलेज ऑफ एज्युकेशन, डी.एड. कॉलेज<br>एम. जे. कॉलेज कॅम्प्स, जळगाव, जि. जळगाव. 0257-2227959<br>9822650252 |
| | | 5★ | अमळनेर | 53155A | नवीन मराठी शाळा, लोकमान्य शिक्षण मंडळ, अंमळनेर<br>जि. जळगाव - (02587) 224330/9226328880/<br>9423930649 |
| 4 | **नाशिक** | 1★ | नाशिक | 53155 | वैनतेय विद्यालय व ज्यु. कॉलेज ऑफ सायन्स<br>मु.पो. निफाड, जि. नाशिक. संपर्क : (02550) 241066<br>मो.9665265648 |
| | | 2★ | नाशिक | 54268 | शिशुविहार बालक मंदिर, राम भूमी<br>डॅ. मुंडेरोड, उपनगर, नाशिकरोड, जि. नाशिक. संपर्क: (0253) 2309616<br>मो.942396043, 9881492988 |
| | | 3★ | नाशिक | 54358 | आदित्य इंग्लिश मेडीअम स्कूल, सर्वे नं.30/3, करनानगर,<br>आर.टी.ओ. ऑफीसच्या समोर, पेठ रोड, नाशिक - 422004<br>0253-26062111, kalpanapatil@gmail.com |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | अ.क्र. | ठिकाण | केंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्राचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | 4★ | नाशिक | 54359 | मिरा क्रिएैशन एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटी, 4, विमल पार्क, नामको बँकेच्या खाली पंपींग स्टेशन, गंगापूररोड, नाशिक, जि. नाशिक-422013/9881728905 shingotetushar@yahoo.co.in/ Bhaleraorasika07@gmail.com |
| | | 5★ | नाशिक | 54372 | गौतमी लोकसंचालित साधन केंद्र, निफाड, पो. निफाड, ता. निफाड, जि. नाशिक. 02550-240066/ 9423802644 cmrcnifad10@gmail.com |
| | | 6★ | नाशिकरोड | 54294 | वनिता विकास मंडळ, प्राथमिक शाळा भारत प्रतिभूती मुद्रणालय, नाशिकरोड, जि. नाशिक |
| | | 7 | चांदोरी | 5417A | न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज, चांदोरी, ता. निफाड, जि. नाशिक - 422201 फोन : (02552) 232093, मो.9822819949 |
| **6** | **पुणे विभाग** | | | | |
| 1 | **पुणे** | 1 | भोसरी | 62344 | भारतीय जीवन विकास मंडळ एस.आर. 18, धराडे वस्ती, शीवगणेश नगर, खोंडीबा कांडगे मार्ग भोसरी, जि. पुणे. संपर्क: 9403902871/9767070833 |
| | | 2★ | महालुंगे | 62351 | महालुंगे ट्रस्ट डी.एड. कॉलेज मु.पो. महालुंगे, ता. खेड, जि. पुणे संपर्क : (02335) 259213/9890524242 (mahalungedtedyahoo.com) |
